## प्रकरण : चार

# तथ्य विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

## (बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेची वस्तुस्थिती)

भाग – एक

४.१ पुणे जिल्हा सामान्य माहिती

४.२ बारामती तालुका सामान्य माहिती

४.३ बारामती तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे विश्लेषण (२००५ ते २०१४)


४.४ इंदापूर तालुका सामान्य माहिती

४.५ इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे विश्लेषण (२००५ ते २०१४)

भाग – दोन

बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थी व रेशनधान्य दुकानदारांच्या मुलाखतीमधील माहितीचे विश्लेषण व सारणीकरण

➤ **पुणे जिल्ह्याचे महाराष्ट्र राज्यातील स्थान दर्शवणारा नकाशा**




## ४.१ पुणे जिल्हा सामान्य माहिती

पुणे जिल्हयाचा अक्षवृत्तीय विस्तार १७ अंश ५४' ते १० अंश २४' उत्तर अक्षवृत्तांच्या दरम्यान आहे आणि रेखावृत्तीय विस्तार ७३ अंश १९' ते ७५ अंश १०' पुर्व रेखावृत्तापर्यंत आहे. पुणे जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र १५.६४२ चौ.कि. मी. आहे. पुणे जिल्हयाच्या सीमेस उत्तरेस व पूर्वेस अहमदनगर जिल्हा, आग्नेयेस सोलापूर जिल्हा, दक्षिणेला सातारा जिल्हा, पश्चिमेस रायगड जिल्हा  वायव्येला ठाणे जिल्हा आहे. पुणे जिल्हा हा क्षेत्रानुसार राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. तसेच राज्याचे ५.१०% क्षेत्र पुणे जिल्हयाने व्यापलेले आहे.

पुणे जिल्ह्यात आंबेगाव, इंदापूर, खेड, जुन्नर, दौंड, पुणे शहर, पुरंदर, बारामती, भोर, मावळ, मुळशी, वेल्हे, शिरुर, हवेली या. १३ तालुक्यांचा समावेश आहे.

**तक्ता क्र. १**

**पुणे जिल्ह्यातील जमीनीचा स्तर दर्शवणारा तक्ता**

| अ.क्र. | तपशिल | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १ | लागवडीखालील जमीन | ९९८५२२ हे. |
| २ | जिरायती जमीन | ७५६११८ हे. |
| ३ | बागायती जमीन | २४२४०४ हे. |

| **हंगाम** | **महत्त्वाची पिके** |
|---|---|
| १. खरीप | बाजरी, तांदूळ |
| २. रब्बी | गहू, हरभरा |
| ३. खरीप व रब्बी | ज्वारी |

ऊस व द्राक्षे ही नगदी पिके या जिल्ह्यात घेतली जातात. मावळ तालुक्यात इंद्रायणी व भोर तालुक्यात आंबेमोहोर तांदूळ प्रसिध्द आहे.[१]

## ➢ हवामान व पर्जन्य

पुणे जिल्ह्यात हवामान उष्ण असले तरी पश्चिम भाग थंड, तर मध्यभाग कोरड्या हवामानाचा आहे. जिल्ह्याच्या पूर्वेकडे उष्ण व कोरडे हवामान आहे. पुणे जिल्ह्यात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. पावसाचे प्रमाण पूर्वेकडे कमी कमी होत जाते. अति पूर्व भागामध्ये ४०० ते ६०० मीलीमीटर पाऊस पडतो. मावळ, मुळशी, वेल्हे, भोर, आंबेगाव, जुन्नर हे तालुके कोकण किनारपट्टी असल्यामुळे येथे पावसाचे प्रमाण जास्त आहे. पुणे जिल्ह्यात सरासरी पर्ज्यन्यमान जरी चांगले असले तरी मावळ, मुळशी,

वेल्हे, शिरुर, या तालुक्यांमध्ये पर्ज्यन्यमान जास्त प्रमाणात आहे. पुरंदर, बारामती, इंदापूर, दौंड , शिरुर तालुक्यात पर्ज्यन्यमान कमी आहे.[२]


➢ **पुणे जिल्ह्यातील प्रशासकिय उपविभाग**[३]

**तक्ता क्र.२**

**पुणे जिल्ह्यातील प्रशासकिय उपविभाग दर्शवणारा तक्ता**

| अ.क्र. | पुणे जिल्ह्यातील प्रशासकिय उपविभाग | तालुके |
|---|---|---|
| १ | बारामती उपविभाग | बारामती, इंदापुर, दौंड |
| २ | भोर उपविभाग | वेल्हे, भोर, पुरंदर |
| ३ | हवेली उपविभाग | पुणे शहर, हवेली |
| ४ | खेड उपविभाग | जुन्नर, आंबेगाव, खेड |
| ५ | मावळ उपविभाग | शिरुर, मुळशी, मावळ |

➢ **बारामती तालुक्याचे स्थान दर्शविणारा नकाशा**




### ४.२ बारामती तालुका सामान्य माहिती

बारामती तालुक्याचे ठिकाण पुण्यापासून ११० कि. मी. अंतरावर आग्नेय दिशेला आहे. उत्तर अक्षांश १८'१० पूर्व व रेखांश ७४'३९ अशा भौगोलिक रचनेत बारामती तालुक्याचे ठिकाण आहे.

शिवकालीन काळात बारामती या नगरीचे नाव द्वादशमतीनगर होते. त्यानंतर बारामतीचा भीमथडी असा उल्लेख केला जात होता. बारामती तालुक्यात निरा व कऱ्हा या महत्त्वाच्या नद्या असून त्यांचा संगम सोनगाव येथे झाला आहे.

इ. स. १६०३ मध्ये छत्रपती मालोजी राजे भोसले यांच्या ताब्यात बारामती होती. पुढे शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या स्वराज्यामध्ये बारामतीचा कारभार दादाजी कोंडदेव यांनी चालवला. त्यानंतर दिल्लीच्या मोगलांचा अंमल सुरु झाला. मोगलांच्या कारभाराचा पुरावा हा चांदवशाली दर्ग्याच्या इनामतीच्या सनदेनुसार समजतो. १७४३ मध्ये शाहु महाराजांनी बाबूजी नाईक यांना बारामतीची जहागिरी दिली त्यात सांगवी, गुणवडी, माळवाडी, कटफळ, गोजुबावी, कन्हेरी व सर्व बारामती महालाचा समावेश होता.

बारामती तालुक्याचे पर्जन्यमान हे सरासरी २० इंचापर्यंत आहे. संपूर्ण वर्षात पावसाचे सरासरी दिवस ३५ ते ४० असतात. निरा डावा कालवा  हा बारामतीच्या संपूर्ण भागात नाही त्यामुळे कोरडवाहू शेत जमीनही बारामती भागात आहे. १८६५ साली बारामती नगरपालिकेची स्थापना झाली. १८८० च्या सुमारास बारामतीमध्ये मोठा दुष्काळ पडला होता. अन्नासाठी बारामतीकरांनी दंगली केल्या होत्या. त्या फेमीन रायटर्स म्हणून नोंदवल्या गेल्या आहेत.

दुष्काळी कामांच्या माध्यमातूनच ११० मैल लांबीचा निरा डावा कालवा तयार केला गेला. १९६२ पासून शरद पवार यांनी त्यांचे राजकारणात वलय तयार केले. १९५८ पासून १० वर्षे युवकांच्या राजकिय चळवळीत सक्रिय राहिले. १९६७ मध्ये बारामतीमधून ते विधानसभेवर निवडून गेले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, भारताचे संरक्षणमंत्री, भारताचे कृषीमंत्री, अशा अनेक महत्त्वाच्या पदावर त्यांनी कार्य केले आहे.

बारामती तालुक्यात शैक्षणिक सुविधा मोठया प्रमाणात आहेत. महाराष्ट्र एज्यूकेशन सोसायटि, शाहू हायस्कूल, अनेकांन्त एज्युकेशन सोसायटी, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, विद्याप्रतिष्ठान मराठी व इंग्रजी शाळा, बी फार्मसी, डी फार्मसी कॉलेज, ॲग्री कॉलेज, बायोटेक्नॉलॉजी यासारख्या अनेक शैक्षणिक संस्था बारामतीमध्ये शैक्षणिक कार्य करतात. बारामतीमध्ये २००० एकरापेक्षा जास्त क्षेत्रात औद्योगिक वसाहत वसलेली आहे. आधुनिक शेती, पाझर तलाव, वनसंवर्धन व वनविस्तार, फळबाग विभाग, आदर्श नर्सरी, कुक्कुटपालन, युवकांना शेती प्रशिक्षण, रेशीम पैदास, माती परिक्षण, शेती विज्ञान, विज्ञान मंडळ, इ. अनेक योजना शेती साठी कार्यरत आहेत. बारामती दूध संघाची स्थापना करुन ग्रामीण भागातील लोकांच्या जोडधंद्यांना बळकटी देण्यात आलेली आहे.

- **बारामती तालुक्याची लोकसंख्या**[3]

**तक्ता क्र.३**

**पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्याची लोकसंख्या दर्शवणारा तक्ता**

| वर्ष | एकूण लोकसंख्या | | एकूण पुरुष | | एकूण स्त्रिया | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी |
| १९५१ | १०४३७७ | २९८९४ | ५२५१७ | १५१०८ | ५११६० | १४७८६ |
| १९६१ | १५३६२९ | २११११८ | ७७३७५ | १०८७७ | ७५३२४ | १०२२४ |
| १९७१ | १९९७९५ | २७९१२ | १०२२२२ | १४३३६ | ९७५७३ | १३५७६ |
| १९८१ | २००३९० | ३७१२१ | ११२२६६ | १९२४४ | १०८१२४ | १७८७१ |
| १९९१ | २६५९२७ | ४४५१५ | १३६८९१ | १३१४८ | १२९२९६ | २१३६७ |
| २००१ | ३२१५१८ | ५१३३४ | १६६०१४ | २६५८३ | १५५५०४ | २४७५१ |
| २०११ | ३५६२५३ | ७३७५३ | १८३९२८ | ३७६९८ | १७२३२५ | ३६०५९ |

१९५१ ते २०११ या कालखंडातील बारामती तालुक्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येचा तपशील वरील तक्त्यात दर्शवला आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील ग्रामीण भागातील लोकसंख्येचा आढावा घेण्यासाठी वरील विवरण उपयोगी आहे.

➢ **बारामती तालुक्याची महसूल विषयक सर्वसाधरण माहिति खालीलप्रमाणे आहे.**

**तक्ता क्र.४**

**बारामती तालुक्याची महसूल विषयक माहिती दर्शवणारा तक्ता**

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १ | गावाची संख्या | ११७ |
| २ | शहरी लोकसंख्या | ७३७६१ |
| ३ | ग्रामीण लोकसंख्या | ३५५८३९ |
| ४ | एकूण लोकसंख्या | ४२९६०० |
| ५ | भौगोलिक क्षेत्रफळ | १३८२४८ हे. |
| ६ | लागवडी योग्य क्षेत्र | १२३३७१ हे. |
| ७ | तलाठी संख्या | ५३ |
| ८ | मंडल अधिकारी संख्या | ८ |
| ९ | पोलीस पाटलांची संख्या | ३०० |
| १० | ग्रामपंचायत संख्या | १०० |
| ११ | नगरपरिषद संख्या | १ |
| १२ | पंचायत समिती गण | १४ |
| १३ | पंचायत समिती गट संख्या | ७ |
| १४ | पोलीस ठाणे | ३ |
| १५ | प्राथमिक आरोग्य केंद्र | ९ |
| १६ | ग्रामीण रुग्णालये | ३ |

वरील तक्त्यामध्ये बारामती तालुक्यातील सामान्य माहितीच तपशील दर्शवला आहे.

**➢ बारामती तालुक्यातील स्वस्तधान्य वितरण व्यवस्थेची रचना**

तहसिलदार

↓

पुरवठा शाखा अव्वल कारकून

↓

पुरवठा शाखा कनिष्ठ कारकून

↓

गोदाम कारकून

↓

स्वस्तधान्य दुकानदार

↓

लाभार्थी

### ४.३ बारामती तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे विश्लेषण (२००५ ते २०१४)

बारामती तालुक्यातील पुरवठा शाखेचे प्रमुख तहसिलदार आहेत. त्यांच्या अंतर्गत पुरवठा शाखेचे कामकाज पहाण्यासाठी एक अव्वल कारकून व एक कनिष्ठ कारकून आहे त्यांच्या मदतीला गोदाम पाल असतात. बारामती तालुक्यातील रेशन दुकानदारांचे कामकाज पहाण्याचे काम अव्वल कारकून तहसिलदारांच्या अंतर्गत करतात. लाभार्थ्यांची तक्रार असेल किंवा एखाद्या दुकानदाराची अडचण असेल

त्याबाबतचे मार्गदर्शन करण्याचे काम अव्वल कारकून करतात त्यांच्याकडून एखाद्या व्यक्तीचे समाधान जर झाले नाही तर त्यांचे निराकरण करण्याचे काम तहसिलदार करत असतात.[५]

**तक्ता क्र.५**

**बारामती तालुक्यातील स्वस्तधान्य दुकाने व रेशनकार्ड संख्या दर्शवणारा तक्ता**


**(२००५–०६ ते २०१४–१५)**

| वर्ष | दुकानांची संख्या | कारवाईसाठी प्रस्तावित दुकानांची संख्या | निलंबित परवाने | रेशनकार्ड धाराकांची संख्या | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंत्योदय | बी.पी.एल. | ए.पी.एल | |
| २००५–०६ | उ.ना. | उ.ना. | उ.ना | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| २००६–०७ | २०३ | ११ | ० | ९६५१ | १६०१४ | ७०५२२ | ९६१८७ |
| २००७–०८ | १९९ | १३ | ० | ९६६० | १६०२० | ७०५३० | ९६२१० |
| २००८–०९ | २०१ | ९ | ० | ९६६५ | १६०३० | ७०५३० | ९६२२५ |
| २००९–१० | २०३ | १७ | ८ | ९६९७ | १६०५४ | ७०५३९ | ९६२८१ |
| २०१०–११ | २०३ | १६ | ० | ९६९७ | १६०५६ | ७०५३९ | ९६२९२ |
| २०११–१२ | १९४ | २९ | १८ | ९४२० | १५०४१ | ७१४८५ | ९५९४६ |
| २०१२–१३ | १९४ | ५ | ० | ९४२० | १५०४१ | ७१४८५ | ९५९४६ |
| २०१३–१४ | २१९ | ९ | ० | ९४६५ | १६०९४ | ७५७३८ | १०१२९७ |
| २०१४–१५ | २१४ | ८ | ० | ९४६४ | १६०९४ | ७५७३२ | १०१२९० |

**आलेख क्र.**१ **(तक्ता क्र.**१ **नुसार)**

➢ **बारामती तालुक्यातील निलंबित स्वस्तधान्य दुकानांची संख्या**

(२००५–०६ ते २०१४–१५)





बारामती तालुक्यामध्ये (२००५–०६ ते २०१४–१५) या १० वर्षाच्या कालखंडामध्ये ११७ स्वस्तधान्य दुकानांवर कारवाई करण्यात आली. त्यामध्ये निलंबित दुकानांची संख्या फक्त २६ आहे.

**आलेख क्र.३ (तक्ता क्र.१ नुसार)**

➢ **बारामती तालुक्यातील अंत्योदय रेशनकार्ड संख्या दर्शविणारा आलेख.**


(२००५–०६ ते २०१४–१५)



बारामती तालुक्यातील (२००५–०६ ते २०१४–१५) या १० वर्षाच्या कालखंडात अंत्योदय शिधापत्रिका असलेल्या लाभार्थ्यांमध्ये १८७ ने घट झाली आहे.

**आलेख क्र.**३ **(तक्ता क्र.**१ **नुसार)**


**बारामती तालुक्यातील बी.पी.एल. रेशनकार्ड संख्या दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे. (२००५–०६ ते २०१४–१५)**




बारामती तालुक्यात (२००५–०६ ते २०१४–१५) या १० वर्षाच्या कालखंडामध्ये बी.पी.एल. रेशनकार्ड असलेल्या लाभार्थ्यांची संख्या वाढली आहे. २००६ साली बीपीएल कार्डधारकांची संख्या ही १६०१४ एवढी होती. २०१४ साली बीपीएल लाभार्थ्यांची संख्या १६०९४ एवढी झाली आहे. बारामती व इंदापूर तालुक्यातील लाभार्थ्यांच्या कौटुंबिक उत्पन्नाच्या माहितीनुसार १५ हजारापेक्षा कमी उत्पन्न असलेले लाभार्थी फक्त १३% आहेत.

आलेख क्र.४ (तक्ता क्र.१ नुसार)

➢ **बारामती तालुक्यातील ए.पी.एल. रेशनकार्ड संख्या दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे. (२००५–०६ ते २०१४–१५)**




बारामती तालुक्यात (२००५–०६ ते २०१४–१५) या १० वर्षाच्या कालखंडामध्ये एपीएल रेशनकार्ड असलेल्या लाभार्थ्यांची संख्या वाढली आहे. २००६ साली एपीएल कार्डधारकांची संख्या ही ७०५२२ एवढी होती. २०१४ साली एपीएल लाभार्थ्यांची संख्या ७५७३२ एवढी झाली आहे.

**तक्ता क्र.** ६

## ➢बारामती तालुक्यासाठी प्राप्त धान्याचा तपशील (गहू व तांदुळ)

## (२००५–०६ ते २०१४–१५)

| वर्ष | नियतन ( मे.टन) | | उचल ( मे.टन) | |
|---|---|---|---|---|
| | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ |
| २००५□२००६ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| २००६□२००७ | १२८८९ | ७०८७ | १२८८९ | ७०८७ |
| २००७□२००८ | १२९११ | ८००१ | १२९११ | ८००१ |
| २००८□२००९ | १३१११ | ८०११ | १३१११ | ८०११ |
| २००९□२०१० | १३१८५ | ८०६४ | १३१८५ | ८०६४ |
| २०१०□२०११ | १३२११ | ८०७१ | १३२११ | ८०७१ |
| २०११□२०१२ | १२७६३ | ८०४२ | १२७६३ | ८०४२ |
| २०१२□२०१३ | १२७६३ | ८०४२ | १२७६३ | ८०४२ |
| २०१३□२०१४ | १३४८० | ८५११ | १३४८० | ८५११ |
| २०१४□२०१५ | १३४६० | ८४९० | १३४६० | ८४९० |

बारामती तालुक्यासाठी (२००५–०६ ते २०१४–१५) या कालखंडामध्ये सार्वजनिक वितरण योजनेच्या माध्यमातून १०४५६२ में. टन गहू व ७२३१९ में. टन तांदुळ प्राप्त झाला आहे.

**तक्ता क्र.७**


## ➢ बारामती ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील एकूण कुटुंब संख्या

**(२००५ ते २०१४)**

| वर्ष | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या | संदर्भ वर्ष |
|---|---|---|
| २००५ | उ. ना. | उ. ना. |
| २००६ | १६६१३ | १९९८ |
| २००७ | १६६२९ | २००६ |
| २००८ | १५२३० | २००७ |
| २००९ | १४३१२ | २००२ |
| २०१० | १७७९४ | २००९ |
| २०११ | १७७९१ | २०१० |
| २०१२ | १७७८० | २०११ |
| २०१३ | १७७७९ | २०१२ |

**आलेख क्र.१ (बारामती तालुका तक्ता क्र.३ नुसार)**

**बारामती ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील एकुण कुटुंब संख्या**




२००६ ते २००७ या कालावधीमध्ये बारामती तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची

संख्या वाढली आहे. २००८ ते २००९ या कालावधीत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या कमी झाली आहे. २००९ नंतर दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या ही स्थिर आहे. त्यांच्यात जास्त वाढ किंवा जास्त घट झालेली नाही. परंतु २००६ ते २०१४ या कालावधीमध्ये बारामतीमधील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या वाढलेली आहे. बारामती तालुक्यातील बागायती भागाचा तसेच कौटुंबिक उत्पन्नाचा विचार केला तर या आकडेवारीतील ४०% च खरे लाभार्थी दारिद्र्यरेषेखाली आहेत.

**तक्ता क्र. ८**


**➢ बारामती तालुक्यातील धान्यवितरणासाठी गोदामांची क्षमता (मे. टन)**

**(२००५–०६ ते २०१४–१५)**

| (२००५-२००६ ते २०१४-२०१५) | गोदामांची संख्या | | गोदामांची क्षमता ( मे. टन) | |
|---|---|---|---|---|
| | शासकीय | भाड्याने घेतलेले | शासकीय | भाड्याने घेतलेले |
| २००५-२००६ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| २००६-२००७ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| २००७-२००८ | १ | १ | ५०० | १२०० |
| २००८-२००९ | ० | १ | ० | १२०० |
| २००९-२०१० | ० | १ | ० | १२०० |
| २०१०-२०११ | ० | २ | ० | १३५० |
| २०११-२०१२ | ० | १ | ५०० | १२०० |
| २०१२-२०१३ | १ | १ | ५०० | १२०० |
| २०१३-२०१४ | २ | ० | ३५०० | ० |
| २०१४-२०१५ | २ | ० | ३५०० | ० |

२००५ ते २०१५ या कालावधीमध्ये बारामती तालुक्यात शासकीय गोदामांची संख्या ६ आहे. भाडयाने घेतलेल्या गोदामांची संख्या ७ आहे. शासकीय गोदामामध्ये ८५०० मे. टन धान्याची साठवणूक करण्यात आली आहे. तर भाडयाने घेतलेल्या गोदामात ७३५० मे. टन धान्याची साठवणूक करण्यात आली आहे.

➤ **इंदापूर तालुक्याचे स्थान दर्शवणारा नकाशा**




### ४.४ **इंदापूर तालुका सामान्य माहिती**

इंदापूर तालुका हा पुण्याच्या पुर्वेस १३५ कि. मी. अंतरावर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९ (नवीन ६५) पुणे सोलापूर रोडवर आहे. प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेला तालुका असून त्याची निर्मिती १९२० मध्ये झाली. पूर्वी काही वर्षाअगोदर इंदापूरचे नाव इंद्रपुरी असे होते. पुणे जिल्ह्यातील सर्वात निकृष्ट कमी उत्पादन देणारा तालुका म्हणून इंदापुर तालुका ओळखला जात असे.

क्षेत्रफळाच्या दृष्टिने जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचा तालुका आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांची वास्तव्य लाभलेली एक गढी हे ऐतिहासिक स्थळ म्हणून इंदापूर शहराला

ओळखले जाते. इंदापूर च्या पूर्वेस १६ कि. मी. अंतरावर उजनी धरण आहे. सदरचे धरण हे सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात आहे. इंदापूर तालुक्यात एकूण १४३ महसुली गावे आहेत. तसेच ८ महसुल मंडळ, ४७ तलाठी सज्जे, ७ जि.प. गट, १ नगरपरिषद, व ११५ ग्रामपंचायती आहेत. ऊस, डाळिंब अशी महत्त्वाची पिके या तालुक्यात घेतली जातात. बिल्ट नावाची पेपरची निर्मिती करणारी कंपनी या तालुक्यात आहे. नीरा व भिमा नद्यांच्या पाण्यावर मोठया प्रमाणावर जलसिंचन झाले आहे. त्यामुळे बागायती शेती, औद्योगिक क्षेत्र, मत्स्य व्यवसाय, पाणी पुरवठा या योजना मोठया प्रमाणावर वाढल्या आहेत. इंदापूर तालुक्याच्या सर्वांगिण विकासात भिमा व निरा नद्यांचे स्थान महत्त्वाचे राहिलेले आहे.

### ➢ इंदापूर तालुक्यातील जमीन

इंदापूर तालुक्यातील जमिनीची प्रतवारी पाहिली असता ती काळी, तांबडी, रेगूर, पोयटा, खडकाळ असून पिकावू जमीन ४३०८३ हेक्टर आहे. काही जमीन उताराची असून ती खडकाळ स्वरुपाची आहे. इंदापूर तालुक्यातील सन २०१३ मध्ये एकूण जमीनधारकांची संख्या ९९९७५ एवढी होती. त्यापैकी १ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असलेले शेतकरी ४७३००, १ ते २ हेक्टर क्षेत्र असलेल्यांची संख्या २८१८० , २ ते ४ हेक्टर शेतकरी १८७९० आहेत. शेतीसाठी जलसिंचनाचे क्षेत्र वाढत असल्याने बागायती क्षेत्रात वाढ झालेली आहे.

### ➢ इंदापूर तालुक्याची लोकसंख्या

**तक्ता क्र.९**

**इंदापूर तालुक्याची लोकसंख्या दर्शवणारा तक्ता**

| वर्ष | शहरी भागातील लोकसंख्या | | | ग्रामीण भागातील लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्त्री | पुरुष | एकूण | स्त्री | पुरुष | एकूण |
| २००१ | १०३६२ | ११२३० | २१५९२ | १५७४८४ | १६९३३७ | ३२६८२१ |
| २०११ | १२२०३ | १३२३९ | २५४४२ | १७१६८४ | १८५९७४ | ३५७६६८ |

## ४.५ इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे विश्लेषण (२००५ ते २०१४)

इंदापूर तालुक्यातील पुरवठा विभागाचे कामकाज हे तहसिलदारांच्या मार्गदर्शनाखाली चालते. त्यांच्या मदतीला अव्वल कारकून असतात तर कनिष्ठ कारकून हे अव्वल कारकूनांना मदतीला असतात. गोदाम व्यवस्थेचे कामकाज पहाण्यासाठी गोदाम कारकून असतात तर एक शिपाई त्यांच्या मदतीला असतो.

➢ **तालुक्यातील सर्व प्रकारचे घाऊक तसेच किरकोळ परवाने संख्या – ५४४ (२०१७)**

**तक्ता क्र.१०**

**तालुक्यातील सर्व प्रकारचे घाऊक तसेच किरकोळ परवाने संख्या – ५४४**

| अ.नं. | परवान्याचा प्रकार | एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | घाऊक एकत्रित परवाने | ४९ |
| २ | घाऊक रॉकेल परवाने | ५ |
| ३ | किरकोळ रॉकेल परवाने | २९७ |
| ४ | रास्त भाव धान्य दुकाने | १९३ |
| ५ | एकूण | ५४४ |

➢ **तालुक्यातील रास्तभाव दुकानांची संख्या** (२०१७)

**तक्ता क्र.११**

**तालुक्यातील रास्तभाव दुकानांची संख्या** (२०१७)

| अ. नं. | रास्तभाव दुकानाचा तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक दुकाने | १२७ |
| २ | सहकारी सोसायट्या व संस्था दुकाने | २८ |
| ३ | महिला बचत गट | ३८ |
| ४ | एकूण | १९३ |

➢ इंदापूर तालुक्यातील केरोसिन वितरकांची संख्या ८ आहे

मे. एल. एस. पाटील, इंदापूर, मे. नॅशनल ट्रेडर्स, भिगवण, मे. सोनाज आणि कंपनी, भिगवण

में. सिध्दीविनायक एजन्सी, में. एस. पी.लेंगरेकर बारामती, में. मार्शल एजन्सी

में. एफ. सी. कटारीया दौंड ,में. संगिता डिस्ट्रीब्युटर्स, में. वाडीलाल ॲन्ड सन्स

**इंदापूर तालुका तक्ता क्र. १२**

➢ **इंदापूर तालुक्यातील स्वस्तधान्य दुकाने व रेशनकार्ड संख्या तपशील खालीलप्रमाणे.**(२००५–२००६ **ते** २०१४–२०१५ )

| २००५–०६ ते २०१४–१५ | दुकानांची संख्या | कारवाई साठी प्रस्तावित दुकानांची संख्या | निलंबित परवाने | रेशनकार्ड संख्या | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंत्योदय | बी.पी.एल | ए.पी.एल. | |
| २००५–०६ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ.ना. | उ. ना. | ........... |
| २००६–०७ | १७५ | १५ | ० | ६५३० | १६३१५ | ५५२२१ | ७८०६६ |
| २००७–०८ | १७२ | १६ | ० | ६५३४ | १६३९९ | ५५२३२ | ७८१६५ |
| २००८–०९ | १६८ | २ | ० | ६५३५ | १६४२१ | ५५४०१ | ७८३५७ |
| २००९–१० | १७० | ८ | ० | ६५४९ | १६४७५ | ५५४०९ | ७८४३३ |
| २०१०–११ | १७१ | ७ | १ | ६५४९ | १६४७५ | ५४५७७ | ७७६०१ |
| २०११–१२ | १५९ | १२ | १ | ६४५० | १६३३३ | ५०६०८ | ७३३९१ |
| २०१२–१३ | १६० | ७ | १ | ६३३५ | १६१२३ | ५५०४४ | ७७५०२ |
| २०१३–१४ | १७३ | १७ | ५ | ६३३५ | १६१२३ | ५६२४४ | ७८७०२ |
| २०१४–१५ | १७८ | ६ | ० | ६५३५ | १६१२३ | ५६२११ | ७८८६९ |


इंदापूर तालुक्यातील २००५ ते २०१५ या कालखंडातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेशी संबंधित माहितीचे संकलन करण्यात आले आहे. संशोधन विषयातील गृहितकांची पडताळणी करण्यासाठी

संकलित माहिती गरजेची आहे. २००५ ते २०१५ या कालखंडात स्वस्तधान्य दुकानांची संख्या पुरवठा विभागाने कारवाई केलेल्या दुकानांची संख्या, निलंबित परवाने, अंत्योदय, बीपीएल, एपीएल शिधापत्रिकाधारकांची संख्या याबाबतचा आढावा घेण्यात आला आहे. याबाबतचे विश्लेषण आलेख्याच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

**इंदापूर तालुका आलेख क्र. १ (इंदापूर तालुका तक्ता क्र. १ नुसार)**

**इंदापूर तालुक्यातील निलंबित स्वस्तधान्य दुकानांची संख्या**

**(२००५–०६ ते २०१४–१५)**





इंदापूर तालुक्यात २००५–२००६ ते २०१४–२०१५ या कालखंडात एकूण ९० स्वस्तधान्य दुकानांवर कारवाई करण्याची शिफारस पुरवठा विभागाने केली होती. त्यामध्ये फक्त ८ दुकानांचे परवाने निलंबित झालेले आहेत.

**इंदापूर तालुका आलेख क्र. २ ( इंदापूर तालुका तक्ता क्र. १ नुसार)**

➢ **इंदापूर तालुक्यातील अंत्योदय, बीपीएल व एपीएल कार्डसंख्या तपशील खालीलप्रमाणे.**

**(२००५–०६ ते २०१४–१५)**




इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीत २००५–२००६ ते २०१४–२०१५ या १० वर्षाच्या कालखंडात अंत्योदय, बीपीएल, एपीएल मिळून एकूण कार्डसंख्येचा विचार केला तर २००६ ते २०१२ या दरम्यान लाभार्थी संख्या वाढली आहे. २०१३ ते २०१५ या कालखंडात एकूण लाभार्थ्यांची संख्या पुन्हा वाढली आहे. यापैकी दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचा विचार केला तर एकूण लाभार्थ्यांची संख्या जवळपास तेवढीच आहे.

**इंदापूर तालुका तक्ता क्र.** १३

➢ **इंदापूर  तालुक्यासाठी प्राप्त धान्याचा तपशील (गहू व तांदुळ)**

| (२००५-२००६ ते २०१४-२०१५) | नियतन (मे.टन) | | उचल (मे.टन) | |
|---|---|---|---|---|
| | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ |
| २००५-२००६ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| २००६-२००७ | ११८६६ | ७३०९ | ११८६६ | ७३०९ |
| २००७-२००८ | ११८८१ | ७४०२ | ११८८१ | ७४०२ |
| २००८-२००९ | ११९११ | ७५१० | ११९११ | ७५१० |
| २००९-२०१० | ११९२२ | ७५२२ | ११९२२ | ७५२२ |
| २०१०-२०११ | ११७९६ | ७४११ | ११७९६ | ७४११ |
| २०११-२०१२ | १११५६ | ७३३७ | १११५० | ७३३७ |
| २०१२-२०१३ | ११७८१ | ७७४८ | ११७०० | ७७४८ |
| २०१३-२०१४ | ११९६३ | ७६६८ | ११६०० | ७६६८ |
| २०१४-२०१५ | ११९८९ | ७६८५ | ११९८९ | ७६८५ |

२००५ ते २०१५ या कालखंडात इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या माध्यमातून ६७५९२ मे. टन तांदूळ व १०६२६५ मे. टन गव्हाचे वितरण करण्यात आले आहे.

**इंदापूर तालुका तक्ता क्र.** १४

➢ **इंदापूर तालुक्यातील धान्यवितरणासाठी  गोदामांची क्षमता (मे. टन)**

**(२००५–०६ ते २०१४–१५)**

| (२००५–०६ ते २०१४–१५) | गोदामांची संख्या | | गोदामांची क्षमता (मे.टन) | |
|---|---|---|---|---|
| | शासकीय | भाड्याने घेतलेले | शासकीय | भाड्याने घेतलेले |
| २००५–२००६ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| २००६–२००७ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| २००७–२००८ | १ | ० | १३५० | ० |
| २००८–२००९ | १ | ० | १३५० | ० |
| २००९–२०१० | १ | ० | १३५० | ० |
| २०१०–२०११ | २ | ० | १३५० | ० |
| २०११–२०१२ | २ | ० | १३५० | ० |
| २०१२–२०१३ | २ | ० | १३५० | ० |
| २०१३–२०१४ | १ | ० | १३५० | ० |
| २०१४–२०१५ | २ | ० | १३५० | ० |

२००५ ते २०१५ या कालावधीमध्ये इंदापूर तालुक्यात शासकीय गोदामांची संख्या १२ आहे. भाडयाने घेतलेल्या गोदामांची संख्या ० आहे. शासकीय गोदामामध्ये १०८०० मे. टन धान्याची साठवणूक करण्यात आली आहे.

**इंदापूर तालुका तक्ता क्र.** १५

- **इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील एकुण कुटुंब संख्या**

(२००५ ते २०१४)

| (२००५ ते २०१४) वर्ष | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या | संदर्भ वर्ष |
|---|---|---|
| २००५ | उ. ना. | उ. ना. |
| २००६ | १७३३३ | १९९८ |
| २००७ | १७४११ | २००६ |
| २००८ | १७३१५ | २००७ |

| | | |
|---|---|---|
| २००९ | १६९९८ | २००२ |
| २०१० | १५९२२ | २००९ |
| २०११ | १५९२२ | २०१० |
| २०१२ | १५९५८ | २०११ |
| २०१३ | १४८०० | २०१२ |
| २०१४ | १३२४५ | २०१३ |

२००५ ते २०१४ या कालखंडातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या संख्येचा आढावा वरील तक्त्यात घेण्यात आला आहे. २००५ साली इंदापूर तालुक्यात दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या १७३३३ होती. त्यामध्ये घट होवून २०१४ साली दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या १३२४५ होती.

**भाग – दोन**

**बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थी व रेशनधान्य दुकानदारांच्या मुलाखतीमधील माहितीचे विश्लेषण व सारणीकरण**


१.पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थ्यांना लाभ होणाऱ्या धान्याचा तपशील खालीलप्रमाणे

➢ **तक्ता क्र.** १

| अ.क्र. | पुरावठा होत असलेल्या धान्याचा प्रकार | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | तांदुळ व गहू | ३०७ | ७७ |
| ३ | साखर,तांदुळ,रॉकेल | ९ | २ |
| ४ | रॉकेल, तांदुळ, गहू | ८४ | २१ |
| ५ | डाळी | ० | ० |
| ६ | कडधान्ये | ० | ० |
| एकूण | | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेअंतर्गत पुरवठा होत असलेल्या धान्याची माहिती दर्शवणारा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**आलेख क्र. १**





वरील माहितीवरुन असे स्पष्ट होते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून ७७% लाभार्थ्यांना तांदुळ व गहू मिळतो, २% लाभार्थ्यांना साखर, तांदुळ, रॉकेल मिळते, २१% लाभार्थ्यांना रॉकेल, तांदुळ, गहू मिळतो या योजनेतून डाळी व कडधान्य वितरणाचे प्रमाण ०% आहे. वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून तांदुळ व गहू जास्त प्रमाणात वितरित होतो तर साखर, रॉकेल वितरणाचे प्रमाण अल्प आहे. या योजनेच्या मार्फत डाळी व कडधान्याचे वितरण मात्र होत नाही.

➢ **तक्ता क्र** २ – पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून लाभार्थ्यांना मिळत असलेल्या धान्याचा दर्जा बाबत माहिती देणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | धान्य चांगले आहे. | १३६ | ३४ |
| २ | धान्य कधी कधी खराब असते. | १८० | ४५ |
| ३ | धान्याचा दर्जा सांगता येत नाही. | ८४ | २१ |
| एकूण | | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून लाभार्थ्यांना मिळत असलेल्या धान्याचा दर्जा विषयी माहिती देणारा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**आलेख क्र.** २




वरील तक्ता असे निरीक्षण असे दर्शवितो कि, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून लाभार्थ्यांना मिळत असलेल्या धान्याचा दर्जा चांगला आहे असे ३४% लाभार्थ्यांना वाटते तर या योजनेतून मिळणारे धान्य कधी कधी खराब असते असे ४५% लाभार्थ्यांना वाटते. २१% लाभार्थ्यांना मात्र धान्याच्या दर्जाबाबत काहिच सांगता येत नाही. वरील पार्श्वभूमीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून लाभार्थ्यांना वितरीत होत असलेल्या धान्याचा दर्जा चांगला नाही तसेच स्थानिक राजकारणामुळे धान्याच्या दर्जाविषयी बोलण्यास काही लाभार्थी नकार देतात.

- **तक्ता क्र.**३


पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत गावातील लोकांमधून विविध रेशन प्रकारासाठी निवडलेले लाभार्थी योग्य निकषांप्रमाणे निवडले आहेत किंवा नाही याबाबत माहिती देणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | योग्य निवड आहे. | ६८ | १७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | योग्य निवड नाही. | २६८ | ६७ |
| ३ | सांगता येत नाही. | ६४ | १६ |
| एकूण | | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत गावातील लोकांमधून विविध रेशन प्रकारासाठी निवडलेले लाभार्थी योग्य निकषांप्रमाणे निवडले आहेत किंवा नाही याबाबत माहिती देणारा आलेख खालील प्रमाणे आहे.

**आलेख क्र** ३




वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यात सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेमार्फत वेगवेगळया रेशनकार्ड योजनांसाठी निवडण्यात आलेल्या लाभार्थ्यांची निवड योग्य निकषांप्रमाणे करण्यात येते असे १७% लाभार्थ्यांना वाटते.


लाभार्थ्यांची निवड योग्य निकषांप्रमाणे होत नाही असे ६७% लाभार्थ्यांना वाटते. १६% लाभार्थ्यांना याबाबत काहीच सांगता येत नाही. वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत गावातील लोकांमधून विविध रेशन प्रकारासाठी निवडलेले लाभार्थी योग्य निकषांप्रमाणे निवडले जात नाहीत.

➤ **तक्ता क्र.** ४ **–** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून लाभार्थ्यांना सवलतीच्या दरात धान्य मिळाल्यामुळे त्यातून बचत झालेल्या पैशाचा विनीयोग लाभार्थी कशासाठी करतात याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मुलांच्या शिक्षणासाठी | ७६ | १९ |
| २ | घरातील इतर गरजांसाठी | २९२ | ७३ |
| ३ | सांगता येत नाही | ३२ | ८ |
| एकूण | | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून लाभार्थ्यांना सवलतीच्या दरात धान्य मिळाल्यामुळे त्यातून बचत झालेल्या पैशाचा विनीयोग लाभार्थी कशासाठी करतात याबाबत माहिती दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**आलेख क्र.** ४




वरील माहितीवरुन


असे स्पष्ट होते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर  तालुक्यात सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेमार्फत सवलतीच्या दरात मिळत असल्यामुळे बचत झालेल्या पैशातून १९%  पैसा शिक्षणवार खर्च करण्यात येतो तर ७३%  पैसा घरातील इतर गरजांसाठी वापरण्यात येतो. ८% लोकांना बचत झालेल्या पैशाच्या वापराबाबत काहीच सांगता येता नाही. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या माध्यमातून सवलतीच्या दरात अन्न–धान्य उपलब्ध करुन दिल्यावर त्यातून बचत झालेल्या पैशाचा उपयोग लोकांनी शिक्षणासाठी करावा असा विचार अन्नसुरक्षा विधेयकात स्पष्ट करण्यात आला आहे. त्याप्रमाणे लोकांचा खर्च होतो परंतु हा खर्च कमी आहे असे वरील आकडेवारीवरुन स्पष्ट होत आहे.

➢ **तक्ता क्र. ५ –** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत गावातील राजकारणी लोकांचा हस्तक्षेप होतो किंवा नाही याबाबत माहिती दर्शवणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | हस्तक्षेप होतो. | २९६ | ७४ |
| २ | हस्तक्षेप होत नाही. | ४४ | ११ |
| ३ | सांगता येत नाही. | ६० | १५ |
| एकूण | | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत गावातील राजकारणी लोकांचा हस्तक्षेप होतो किंवा नाही याबाबत माहिती दर्शवणारा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**आलेख क्र. ५**




वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत गावातील राजकारणी लोकांचा हस्तक्षेप होतो असे ७४ टक्कें लाभार्थ्यांना वाटते. ११% लाभार्थ्यांना या योजनेत स्थानिक राजकारण्यांचा हस्तक्षेप नाही असे वाटते तर १५% लाभार्थ्यांना याविषयी काहिच सांगता येत नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत गावातील स्थानिक राजकारणी लोकांचा हस्तक्षेप आहे.

➢ **तक्ता क्र. ०६ –** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून वितरीत होत असलेल्या धान्याचे वजन अचूक असते अथवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वजन अचूक असते. | १४८ | ३७ |
| २ | वजन अचूक नाही. | ६८ | १७ |
| ३ | राजकारणामुळे याबाबत काही सांगु शकत नाही. | १८४ | ४६ |
| एकूण | | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून वितरीत होत असलेल्या धान्याचे वजन अचूक असते अथवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे.

**आलेख क्र.** ६





वरील तक्ता असे निरिक्षण असे दर्शवितो की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून वितरीत होत असलेल्या धान्याचे वजन अचूक असते असे ३७% लाभार्थ्यांना वाटते. धान्याचे वजन अचूक केले जात नाही असे १७% लाभार्थ्यांना वाटते तर स्थानिक राजकारणामूळे वजनाबाबत काहिच सांगू शकत नाही अशा लाभार्थ्यांचे प्रमाण ४६% लोकांचे आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेत स्थानिक राजकारणाचा हस्तक्षेप आहे तसेच या योजनेच्या अचूक वजनाबाबत अनेक लाभार्थ्यांना शंका आहे.

➢ **तक्ता क्र. ७ –** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेबाबत लाभार्थ्यांच्या तक्रारीची दखल प्रशासनाकडून किंवा रेशन धान्य दुकानदारांकडून घेतली जाते किंवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | तक्रारीची दखल घेतली जाते. | ४८ | १२ |
| २ | तक्रारीची दखल घेतली जात नाही. | १२४ | ३१ |
| ३ | गावातील राजकारणामुळे तक्रारच करीत नाही. | २२८ | ५७ |
| एकूण | | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेबाबत लाभार्थ्यांच्या तक्रारीची दखल प्रशासनाकडून किंवा रेशन धान्य दुकानदारांकडून घेतली जाते किंवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**आलेख क्र.** ७




वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेबाबत लाभार्थ्यांच्या तक्रारीची दखल प्रशासनाकडून किंवा रेशन धान्य दुकानदारांकडून घेतली जाते असे १२% लाभार्थ्यांना वाटते. तक्रारीची दखल प्रशासनाकडून किंवा रेशन धान्य दुकानदारांकडून घेतली जात नाही असे ३१% लाभार्थ्यांना वाटते, ५७% लाभार्थी मात्र राजकीय हस्तक्षेपाबाबत तक्रार करत नाहीत. नाहीत वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेबाबत लाभार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रशासन किंवा स्वस्तधान्य दुकानदार सहकार्य करीत नाहीत. तथापि या योजनेबाबत काही लाभार्थ्यांना समस्या असूनही स्थानिक


राजकारणामूळे तक्रार करत नाहीत म्हणजेच या योजनेत राजकारणी लोकांचा हस्तक्षेप आहे असे स्पष्ट होते.

➢ **तक्ता क्र. ८ –** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून धान्याचे लाभार्थ्यांना वाटप केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या धान्याचे विवरण किंवा शिल्लक कोटा जाहीर केला जातो किंवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शिल्लक धान्याची माहिती जाहीर करण्यात येते. | ३२ | ८ |
| २ | शिल्लक धान्याची माहिती जाहीर करण्यात येत नाही. | २२० | ५५ |
| ३ | सांगता येत नाही. | १४८ | ३७ |
| | एकूण | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून धान्याचे लाभार्थ्यांना वाटप केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या धान्याचे विवरण किंवा शिल्लक कोटा जाहीर केला जातो किंवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**आलेख क्र. ८**




वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून धान्याचे लाभार्थ्यांना वाटप केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या धान्याचे विवरण किंवा शिल्लक कोटा जाहीर केला जातो असे ८% लाभार्थी माहिती सांगतात. शिल्लक धान्याचा कोटा जाहीर केला जात नाही असे ५५% लाभार्थी सांगतात. ३७% लाभार्थी याबाबत अनभिज्ञ आहेत. सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानदारांकडून शिल्लक राहिलेल्या धान्याची माहिती लाभार्थ्यांना सांगण्यात येत नाही. फलकावर लिहले जात नाही. अर्थात शासनाच्या नियमांचे पालन स्वस्तधान्य दुकानदार करत नाहीत असे स्पष्ट होते.

➢ **तक्ता क्र. ९ –** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानांची तपासणी पुरवठा विभागाकडून होते किंवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | तपासणी होते. | १०८ | २७ |
| २ | तपासणी होत नाही. | १२८ | ३२ |
| ३ | सांगता येत नाही. | १६४ | ४१ |
| एकूण | | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानांची तपासणी पुरवठा विभागाकडून नियमितपणे होते किंवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे आहे.

### आलेख क्र. ९





वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानांची तपासणी पुरवठा विभागाकडून होते असे २७% लाभार्थी सांगतात तर स्वस्तधान्य दुकानांची तपासणी पुरवठा विभागाकडून होत नाही असे ३२% लाभार्थी सांगतात. स्वस्तधान्य दुकानांची तपासणी पुरवठा विभागाकडून होते किंवा नाही याबाबत ४१% लाभार्थ्यांना माहित नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानांची तपासणी पुरवठा विभागाकडून नियमित होत नाही तसेच सर्वसामान्य लाभार्थ्यांना स्वस्तधान्य दुकानाच्या नियमांबाबत काहिच माहिती दिली जात नाही.

➢ **तक्ता क्र. १० –** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकाने धान्य वितरणासाठी आठवडयातून किती दिवस चालू असतात याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १ दिवस | २४० | ६० |
| २ | २ दिवस | १६० | ४० |
| ३ | ३ दिवस | ० | ० |
| ४ | ३ पेक्षा जास्त दिवस | ० | ० |
| एकूण | | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकाने धान्य वितरणासाठी आठवडयातून किती दिवस चालू असतात याबाबत माहिती दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**आलेख क्र.**१०




वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानधान्य वितरणासाठी आठवडयातून १ दिवस चालू असते असे ६०% लाभार्थी म्हणतात तर स्वस्तधान्य दुकान धान्य वितरणासाठी आठवडयातून २ दिवस चालू असते असे ४०% लाभार्थी म्हणतात, आठवडयातून ३ किंवा त्यापेक्षा जास्त दिवस स्वस्तधान्य दुकान धान्य वितरणासाठी चालू नसते. या माहितीवरुन असे स्पष्ट होते की, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील स्वस्तधान्य दुकानदार नियमाप्रमाणे वेळापत्रकाची अंमलबजावणी करत नाहीत.

➢ **तक्ता क्र. ११ –** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानदार, लाभार्थी, प्रशासन यांच्यात समन्वय बैठक होते अथवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ११**

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | समन्वय बैठक होते. | ८८ | २२ |
| २ | समन्वय बैठक होत नाही. | १४८ | ३७ |
| ३ | याबाबत काहिच सांगता येत नाही. | १६४ | ४१ |
| | एकूण | ४०० | १०० |


वरील माहितीवरुन असे स्पष्ट हाते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानदार, लाभार्थी, प्रशासन यांच्यात समन्वय बैठक होते याबाबत २२% लाभार्थी सांगतात, सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानदार, लाभार्थी, प्रशासन यांच्यात समन्वय बैठक होत नाही असे ३७% लाभार्थी सांगतात. स्वस्तधान्य दुकानदार, लाभार्थी, प्रशासन यांच्यात समन्वय बैठक असते अथवा नाही याबाबत ४१% लाभार्थ्यांना काहिच सांगता येत नाही. वरील विश्लेषणातून असे स्पष्ट होते की, सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानदार, लाभार्थी, प्रशासन यांच्यात समन्वय बैठक होत नाही.

➢ **तक्ता क्र. १२ –** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषा ठरविण्यासाठी झालेले सर्वेक्षण योग्य निकषांप्रमाणे झाले अथवा नाही याबाबतची माहिती दर्शवणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षण नियमाप्रमाणे झाले. | ४८ | १२ |
| २ | सर्वेक्षण नियमाप्रमाणे झाले नाही. | ३१६ | ७९ |
| ३ | याबाबत काहीच सांगता येत नाही. | ३६ | ९ |
| एकूण | | ४०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषा ठरविण्यासाठी झालेले सर्वेक्षण योग्य निकषांप्रमाणे झाले अथवा नाही याबाबतची माहिती दर्शवणारा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**आलेख क्र.** १२




वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यात दारिद्र्यरेषा ठरविण्यासाठी झालेले सर्वेक्षण योग्य निकषांप्रमाणे झाले असे १२% लोकांना वाटते तर सर्वेक्षण योग्य निकषांप्रमाणे झाले नाही असे ७९% लोकांना वाटते तर ९% लोकांना याबाबत काहीच सांगता येत नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, दारिद्र्रेषेचे सर्वेक्षण शासनाच्या योग्य निकषांप्रमाणे होत नाही.

➢ **तक्ता क्र. १३ –** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थ्यांकडे शेती आहे किंवा नाही याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शेती आहे. | ३१६ | ७९ |
| २ | शेती नाही. | ८४ | २१ |
| एकूण | | ४०० | १०० |


वरील तक्ता असे निरीक्षण असे दर्शवितो की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत लाभार्थी असलेल्या ७९% कुटुंबांकडे शेती आहे तर २१

कुटुंबांकडे शेती नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, शेती असलेल्या लोकांनाही सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेची गरज आहे.

➢ **तक्ता क्र. १४ –** पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील रेशनधान्य दुकानाचा परवाना देत असताना राजकारणाचा हस्तक्षेप आहे किंवा नाही याबाबत माहिती देणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | राजकारणाचा हस्तक्षेप होतो. | ३६८ | ९२ |
| २ | राजकारणाचा हस्तक्षेप होत नाही. | १२ | ३ |
| ३ | माहिती नाही. | २० | ५ |
| एकुण | | ४०० | १०० |

**आलेख क्र.** १४




वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील रेशन धान्य दुकानाचा परवाना देत असताना स्थानिक राजकारणाचा हस्तक्षेप आहे असे ९२% लाभार्थ्यांना वाटते तर स्थानिक राजकारणाचा हस्तक्षेप नाही असे ३% लाभार्थ्यांना वाटते. ५% लाभार्थी मात्र या प्रक्रियेपासून अलिप्त आहेत. या विवेचनावरुन असे लक्षात येते की, स्वस्तधान्य दुकानाचा परवाना देताना शासकिय नियमाप्रमाणे दुकानांची निवड होत नाही या प्रक्रियेत राजकारणाचा हस्तक्षेप होतो.

➢ **तक्ता क्र.१५ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थी शिधापत्रिकेतील दुरुस्तीसाठी प्रत्यक्षात एकदा तरी स्वत: तहसिल कार्यालयात गेल्याची आकडेवारी दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शिधापत्रिका दुरुस्तीसाठी तहसिल कार्यालयात गेलेले लाभार्थी. | २७३ | ६८ |
| २. | शिधापत्रिका दुरुस्तीसाठी तहसिल कार्यालयात न गेलेले लाभार्थी. | १२७ | ३२ |

| | | |
|---|---|---|
| एकूण | ४०० | १०० |


वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील ६८% लाभार्थी शिधापत्रिकेतील दुरुस्तीसाठी प्रत्यक्षात एकदा तरी स्वत: तहसिल कार्यालयात गेले आहेत.

➢ **तक्ता क्र. १६ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थी शिधापत्रिकेतील दुरुस्तीसाठी तहसिल कार्यालयात गेल्यावर संबंधित शिधापत्रिकेसंदर्भातील काम वेळेत झाले किंवा नाही याबाबतची माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | काम वेळेत झाले. | ३९२ | ९८ |
| २. | काम वेळेत झाले नाही. | ०८ | २ |
| एकूण | | ४०० | १०० |

बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थी शिधापत्रिकेतील दुरुस्तीसाठी तहसिल कार्यालयात गेल्यावर संबंधित शिधापत्रिकेसंदर्भातील काम वेळेत झाले किंवा नाही याबाबतची माहिती दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे.

**आलेख क्र.** १६




वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थी शिधापत्रिकेतील दुरुस्तीसाठी तहसिल कार्यालयात गेल्यावर संबंधित शिधापत्रिकेसंदर्भातील काम वेळेत झाले असा अनुभव २% लाभार्थ्यांना आला तर शिधापत्रिकेसंदर्भातील काम वेळेत झाले नाही असे ९८% लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. याचाच अर्थ असा की, शिधापत्रिकेतील दुरुस्तीसंदर्भातील कामे प्रशासनाकडून वेळेत होत नाहीत.

➤ **तक्ता क्र. १७ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील शिधापत्रिकेतील दुरुस्तीसंदर्भातील कामे कोण करते ही माहिती विचारल्यावर मिळालेल्या प्रतिसादाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | संबंधित कार्यालयातील कर्मचारी दुरुस्तीचे काम करतात. | ३५ | ९ |
| २. | कार्यालयातील खाजगी एजंट कामासाठी मध्यस्ती करतात. | ३६५ | ९१ |
| एकूण | | ४०० | १०० |

बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील शिधापत्रिकेतील दुरुस्तीसंदर्भातील कामे कोण करते ही माहिती विचारल्यावर मिळालेल्या प्रतिसादाचा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**आलेख क्र.** १७





वरील विश्लेषणातून असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील शिधापत्रिकेतील दुरुस्तीसंदर्भातील कामे करण्यासाठी खाजगी एजंट मध्यस्ती करतात असा ९१% लाभार्थ्यांना अनुभव आला तर शिधापत्रिकेतील दुरुस्तीसंदर्भातील कामे काम कार्यालयातील कर्मचारी करतात असा ९% लाभार्थ्यांना अनुभव आला.

➢ **तक्ता क्र. १८ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थ्यांकडे असलेल्या जमीनीची माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | जमीन नाही. | ५५ | १४ |
| २. | एक एकर ते अडीच एकर जिरायती | ८८ | २२ |
| ३. | एक एकर ते अडीच एकर बागायती | ८६ | २१ |
| ४. | अडीच एकर पेक्षा जास्त बागायती | ६३ | १६ |
| ५. | अडीच एकर पेक्षा जास्त जिरायती | १०८ | २७ |
| एकूण | | ४०० | १०० |

बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थ्यांकडे असलेल्या जमीनीची माहिती दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**आलेख क्र.** १८





वरील विश्लेषणातून असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील मुलाखती घेतलेल्या लाभार्थ्यांपैकी १४% लाभार्थ्यांकडे जमीन नाही तर एक एकर ते अडीच एकर जिरायती जमीन असलेल्या लाभार्थ्यांची संख्या २२% आहे. एक एकर ते अडीच एकर बागायती असलेल्या लाभार्थ्यांची संख्या २१% आहे. अडीच एकर पेक्षा जास्त जिरायती जमीन असलेल्या लाभार्थ्यांची संख्या २७% आहे. जमीन नसलेल्या व जिरायती जमीन असलेल्या लाभार्थ्यांची संख्या सरासरी ३६% आहे. जवळपास ६४% लाभार्थी हे जास्त उत्पन्न गटातील आहेत. बारामती व इंदापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांच्या संख्येवरुन तसेच सरासरी जमीनीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थ्यांची निवड निकषांप्रमाणे करण्यात आलेली नाही.

➢ **तक्ता क्र. १९ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न दर्शवणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १५ हजार पेक्षा कमी | ५१ | १३ |
| २. | १५००१ ते १ लाख | ७९ | २० |
| ३. | १ लाख ते १.५ लाख | ८९ | २२ |
| ४. | १.५ लाख ते २ लाख | १२२ | ३० |
| ५. | २ लाखापेक्षा जास्त | ५९ | १५ |
| एकूण | | | |

बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न दर्शवणारा आलेख खालीलप्रमाणे.

**आलेख क्र.** १९




वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील मुलाखती घेतलेल्या लाभार्थ्यांपैकी १५ हजार पेक्षा कमी उत्पन्न असलेले एकूण १३% लाभार्थी आहेत. १५००१ ते १ लाख उत्पन्न असलेले २०% लाभार्थी आहेत. १ लाखापेक्षा जास्त उत्पन्न असलेले ६७% लाभार्थी आहेत. त्यांच्याजवळ असलेल्या शिधाप्रकारानुसार केशरी व पिवळया रंगाच्या शिधापत्रीका दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या ९५% इतकी मोठी आहे.

**तक्ता क्र. २०**

अभ्यास क्षेत्रातील उत्तरदात्यांचे शिधापत्रिकेनुसार केलेले वर्गीकरण दर्शवणारा तक्ता

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पिवळी शिधापत्रिका | ८४ | २१ |
| २. | केशरी शिधापत्रिका | २३६ | ५९ |
| ३. | शुभ्र शिधापत्रिका | ८० | २० |
| एकूण | | ४०० | १०० |

वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीतील मुलाखत घेतलेल्या लाभार्थ्यापकी २१% पिवळया शिधापत्रिका आहेत. केशरी शिधापत्रिका या ५९% आहेत. शुभ्र शिधापत्रिका २०% आहेत. लाभार्थ्यांच्या उत्पन्नाचा जर विचार केला तर १५ हजारापेक्षा कमी उत्पन्न असलेले फक्त १३% लाभार्थी आहेत. पिवळया शिधापत्रिका मात्र २१% आहेत. उत्पन्नाचे प्रमाण व शिधापत्रिकेचा प्रकार यामध्ये फरक सिध्द होत आहे म्हणजेच सार्वजनिक वितरण प्रणालीतील लाभार्थ्यांची निवड निकषांप्रमाणे होत नाही.

➢ **पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील स्वस्तधान्य दुकानदारांच्या मुलाखतीतून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण पुढिलप्रमाणे** ➢ **तक्ता क्र. १ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील स्वस्तधान्य दुकानदारांकडे असलेल्या जमीनीची माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | जमीन नाही. | ११ | ११ |
| २. | एक एकर ते अडीच एकर जिरायती | २८ | २८ |
| ३. | एक एकर ते अडीच एकर बागायती | २४ | २४ |
| ४. | अडीच एकर पेक्षा जास्त बागायती | १९ | १९ |
| ५. | अडीच एकर पेक्षा जास्त जिरायती | १८ | १८ |

| | | |
|---|---|---|
| एकूण | १०० | १०० |

वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील ११% स्वस्तधान्य दुकानदारांकडे जमीन नाही तर २४% दुकानदारांकडे एक एकर ते अडीच एकर बागायती जमीन आहे. एक एकर ते अडीच एकर जिरायती जमीन असलेले २८% दुकानदार आहेत. अडीच एकरपेक्षा जास्त बागायती जमीन असलेले १९% दुकानदार आहेत तर अडीच एकर पेक्षा जास्त जिरायती जमीन असलेले स्वस्तधान्य दुकानदार १८% आहेत. वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, स्वस्तधान्य दुकानांची खरी गरज ३९% लोकांनाच आहे. अडीच एकर पेक्षा जास्त बागायती किंवा जिरायती जमीन असलेल्या लोकांचा उदरनिर्वाह त्यांच्या जमीनीवर होवू शकतो. त्यांच्यापेक्षा गरीब व व्यवसायाची गरज असणारे अनेक लोक आहेत परंतु त्यांना रेशन धान्य दुकान चालवण्याची संधी मिळालेली नाही.

➢ **तक्ता क्र. २ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील दुकानदारांचे कौटुंबिक उत्पन्न दर्शवणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५० हजार | १० | १० |
| २. | ५० हजार ते १ लाख | ३५ | ३५ |
| ३. | १ लाख ते १.५ लाख | २८ | २८ |
| ४. | १.५ लाख ते २ लाख | १५ | १५ |
| ५. | २ लाखापेक्षा जास्त | १२ | १२ |
| एकूण | | १०० | १०० |

वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील १०% स्वस्तधान्य दुकानदारांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न १ हजार ते ५० हजाराच्या आतमध्ये आहे. ३५% दुकानदारांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ३५% आहे तर १ लाख ते १.५ लाख वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असलेले दुकानदार २८% आहेत. १.५ लाख ते २ लाख वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असलेले

दुकानदार १५% आहेत तर २ लाखापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेले १२% दुकानदार आहेत. या आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, स्वस्तधान्य दुकानदारांचे वार्षिक उत्पन्न जास्त असूनही त्यांना स्वस्तधान्य दुकान चालवण्याचा परवाना दिला आहे.

➢ **तक्ता क्र. ३ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील रेशनधान्य दुकानदारांनी धान्य वाटपाचे वेळापत्रक दर्शनी भागात लावले आहे किंवा नाही याबाबतची माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वेळापत्रक दर्शनी भागात लावले आहे. | १५ | १५ |
| २. | वेळापत्रक दर्शनी भागात लावले नाही. | ८५ | ८५ |
| एकूण | | १०० | १०० |

पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील १०० दुकानांचे निरीक्षण केले असता फक्त १५% दुकानदारांनी दर्शनी भागात वेळापत्रक लावले आहे तर ८५% रेशनधान्य दुकानदारांनी दर्शनी भागात धान्यवाटपाचे वेळापत्रक दर्शनी भागात लावले नव्हते. यावरुन असे लक्षात येते की, स्वस्तधान्य दुकानदार धान्यवाटपाच्या वेळेचे बंधन पाळत नाहीत त्यामुळे लाभार्थ्यांची गैरसोय होते. धान्य पुरवठा अधिकारी या नियमांकडे दुर्लक्ष करतात.

➢ **तक्ता क्र. ४ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील रेशनधान्य दुकानदारांनी धान्य वितरणाची माहिती दर्शनी भागात लावले आहे किंवा नाही याबाबतची माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | धान्य वितरणाची माहिती दर्शनीभागात आहे. | २७ | २७ |
| २. | धान्य वितरणाची माहिती दर्शनीभागात नाही. | ७३ | ७३ |
| एकूण | | १०० | १०० |

वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील १०० दुकानांचे निरीक्षण केले असता केवळ २७% दुकानदारांनी दुकानाच्या दर्शनी भागातील फलकावर धान्य साठा आणि शिल्लक धान्याअबातच्या विरणाची माहिती लिहिली आहे. ७३% रेशनधान्य दुकानदारांनी दर्शनी भागातील फलकावर धान्य वितरणाची कोणतीही माहिती लिहिलेली नाही. यावरुन असे लक्षात येते की, रेशन धान्य दुकानदार धान्य वितरणाच्या नियमांचे पालन करत नाहीत. नियमांकडे दुर्लक्ष करून काळाबाजार किंवा तत्सम चुकीच्या गोष्टी करतात.

➤ **तक्ता क्र. ५ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील रेशनधान्य दुकानदारांकडे धान्य वितरणासाठी असलेल्या वजन काटयाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | साधा काटा | ९३ | ९३ |
| २. | इलेट्रॉनिक काटा | ०७ | ०७ |
| एकूण | | १०० | १०० |

वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील ७% स्वस्तधान्य दुकानदारांकडे इलेक्ट्रॉनिक वजन काटा आहे तर ९३% रेशनधान्य दुकानदारांकडे साधा वजन काटा आहे. धान्याचे वितरण जर पारदर्शपणे करायचे असेल तर इलेक्ट्रॉनिक वजन काटयाचा वापर करणे आवश्यक आहे.

➤ **तक्ता क्र. ६ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील स्वस्तधान्य दुकानदारांकडून कोणत्या धान्याचे वितरीत जास्त प्रमाणात करण्यात येते याविषयी माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | गहू व तांदूळ | ९२ | ९२ |
| २. | साखर | ०८ | ०८ |
| ३. | डाळी | ०० | ०० |
| ४. | कडधान्य | ०० | ०० |
| एकूण | | १०० | १०० |

वरील आकडेवारीवरुन लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानदारांकडून वितरीत होत असलेल्या धान्यवितरणाच्या प्रमाणामध्ये ९२% गहू व तांदूळ वितरीत करण्यात येतो तर साखरेचे वितरणाचे प्रमाण ८% आहे. ०% डाळींचे वितरण करण्यात येते तर कडधान्याचे वितरण होतच नाही. या माहितीवरुन असे लक्षात येते की, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून जास्त प्रमाणात गहू व तांदूळ या धान्याचे वितरण करण्यात येते. साखर व डाळ वितरणाचे प्रमाण अल्प आहे. कडधान्याचे वितरण होतच नाही. स्वस्तधान्य दुकानदारांशी चर्चा केल्यावर असे लक्षात आले की, डाळ वितरणासाठी उपलब्ध आहे परंतु डाळीच्या वितरणाचे कमिशन फार कमी आहे. खुल्या बाजारातील डाळीचा भाव व वितरण प्रणातील डाळीचा भाव यामध्ये जास्त फरक नाही. सार्वजनिक वितरण प्रणालीसाठी उपलब्ध डाळीचा दर्जाही चांगला नाही. त्यामुळे डाळींचे व कडधान्यंचे वितरण सार्वजनिक वितरण प्रणालीतून करण्यात येत नाही.

➤ **तक्ता क्र. ७ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील स्वस्तधान्य दुकानदारांना गोदामातून धान्य उचलताना धान्याचा दर्जा प्रमाणित केलेले सीलबंद पाकिट देण्यात येते किंवा नाही याबाबत माहिती दर्शवणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | धान्याचा दर्जा असलेले सीलबंद पाकिट देण्यात येते. | १२ | १२ |
| २. | धान्याचा दर्जा असलेले सीलबंद पाकिट देण्यात येत नाही. | ८८ | ८८ |

| | | |
|---|---|---|
| एकूण | १०० | १०० |

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील धान्याचे वितरण गोदामातून होताना फक्त १२% रेशनधान्य दुकानदारांना धान्याच्या दर्जाबाबत माहिती असलेले सीलबंद पाकिट देण्यात येते. ८८% रेशनधान्य दुकानदारांना मात्र धान्याच्या दर्जाबाबत माहिती असलेले सीलबंद पाकिट देण्यात येत नाही. सार्वजनिक वितरण योजनेतील धान्याचे गोदामातून वितरण करताना धान्याच्या दर्जाबाबत माहिती असलेले सीलबंद पाकिट रेशन धान्य दुकानदारांना देण्यात यावे असा नियम आहे परंतु या नियमाचे पालन होत नाही. याबाबत स्वस्तधान्य दुकानदारांसोबत चर्चा केल्यावर असे लक्षात आले की, लाभार्थ्यांकडून धान्याच्या दर्जाबाबत तक्रार आली व तक्रार पुरवठा विभागाकडे केली तर त्या तक्रारीची दखल पुरवठा विभागाकडून घेण्यात येत नाही. स्वस्तधान्य दुकानदारांनी जर या तक्रारीबाबत पाठपुरावा केला तर रेशन धान्य दुकानाची तपासणी सूड भावनेने करण्यात येते.

➢ **तक्ता क्र. ८ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील स्वस्तधान्य दुकानातील धान्याचे वितरण करताना गावातील राजकिय पदाधिकारी धान्य वितरणात हस्तक्षेप करतात किंवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | राजकिय पदाधिकारी धान्यवितरणात हस्तक्षेप करतात. | ६३ | ६३ |
| २. | राजकिय पदाधिकारी धान्य वितरणात हस्तक्षेप करत नाहीत. | २७ | २७ |
| एकूण | | १०० | १०० |

वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील स्वस्तधान्य दुकानातील धान्याचे वितरण करताना ६३% गावातील राजकिय पदाधिकारी हस्तक्षेप करतात. २७% राजकिय पदाधिकारी मात्र स्वस्तधान्य दुकानातील धान्याचे वितरण करताना

हस्तक्षेप करत नाहीत. रेशन धान्य दुकानदारांसोबत चर्चा केल्यावर असे लक्षात आले की, गावातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी धान्य द्यावे असा दबाव स्थानिक गावातील राजकारणी लोक आणतात. यावरुन असे लक्षात येते की, सार्वजनिक वितरण प्रणालीत राजकिय हस्तक्षेप आहे.

➢ **तक्ता क्र.९ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानांच्या धान्य साठवण्याच्या जागेच्या स्वच्छतेविषयी माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | धान्य साठ्वण्याची जागा नेहमी स्वच्छ करण्यात येते. | २८ | २८ |
| २. | धान्य साठ्वण्याची जागा नेहमी स्वच्छ केली जात नाही. | ७२ | ७२ |
| एकूण | | १०० | १०० |

बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानदारांनी दिलेल्या माहितीवरुन व प्रत्यक्षात केलेल्या निरिक्षणातून असे दिसून आले कि, २८% धान्य दुकानदार धान्य साठवण्याची जागा नियमित स्वच्छ करतात तर ७२% धान्यदुकानदार धान्य साठवण्याची जागा स्वच्छ करत नाहीत. धान्य साठवण्याची जागा नियमित साफ न केल्यामुळे धान्याची नासाडी होते.

➢ **तक्ता क्र. १० –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानातील धान्याचे वाटप कोण करते याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्वतः दुकानदार धान्याचे वाटप करतात. | ३९ | ३९ |
| २. | इतर व्यक्ती. | ६१ | ६१ |
| एकूण | | १०० | १०० |

वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील ३९% स्वस्तधान्य दुकानदार स्वत: धान्याची वाटप करतात तर ६१% धान्यदुकानात इतर व्यक्ती धान्याचे वाटप करतात. यावरुन असे लक्षात येते की, अनेक स्वस्तधान्य दुकानदार स्वस्तधान्य दुकानाचा परवाना काढतात आणि दुसऱ्या व्यक्तीला दुकाना चालवायला सांगून स्वत: इतर कामे करतात. अशा दुकानदारांवर पुरवठा विभागही कारवाई करत नाही.

➤ **तक्ता क्र. ११ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील स्वस्तधान्य दुकानांसमोर दक्षता समित्यांचा बोर्ड लावला आहे किंवा नाही याबाबतची माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | दुकानाच्या दर्शनी भागात दक्षता समितीचा बोर्ड आहे. | १८ | १८ |
| २. | दुकानाच्या दर्शनी भागात दक्षता समितीचा बोर्ड नाही. | ८२ | ८२ |
| एकूण | | १०० | १०० |

वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील १८% सार्वजनिक वितरण योजनेतील स्वस्तधान्य दुकानांसमोर दक्षता समित्यांची माहिती असलेला बोर्ड आहे तर ८२% दुकानांच्या दर्शनी भागात दक्षता समित्यांची माहिती असलेला बोर्ड नाही. स्वस्तधान्य दुकानदारांनी दक्षता समित्यांची माहिती असलेला बोर्ड किंवा फलक स्वस्तधान्य दुकानाच्या दर्शनी भागात लावणे आवश्यक आहे. परंतु या नियमाचे पालन दुकानदार करत नाहीत. परिणामी लाभार्थ्यांनाही स्वस्तधान्य दुकानातील दक्षता समितीबाबत माहिती होत नाही. दक्षता समित्यांचे कामकाज फक्त कागदोपत्री चालते. प्रत्यक्षात दक्षता समितीमधील कोणताही सदस्य नियमाप्रमाणे दुकानाची तपासणी करत नाही. अशी माहिती गावातील काही लोकांसोबत औपचारिक चर्चा केल्यावर मिळाली.

➢ **तक्ता क्र. १२ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील धान्याचा दर्जा खराब आहे अशी तक्रार लाभार्थी करतात किंवा नाही याबाबतची माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | धान्याच्या दर्जाबाबत काही लाभार्थ्यांनी तक्रारी केल्या आहेत. | ३६ | ३६ |
| २. | धान्याच्या दर्जाबाबत तक्रारी नसतात. | ६४ | ६४ |
| एकूण | | १०० | १०० |

वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, स्वस्तधान्य दुकानातील धान्याच्या दर्जाबाबत ३६% लाभार्थी तक्रारी करतात तर ६४% तक्रारी करत नाहीत. दुकानदारांना धान्याच्या दर्जाबाबत विचारले असता धान्य कधी कधी खराब असते असे सांगितले. धान्याच्या दर्जाबाबत पुरवठा अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यास पुरवठा अधिकारी प्रतिसाद देत नाहीत. यावरुन असे लक्षात येते की, स्वस्तधान्य वितरण योजनेतून वितरीत होणारे धान्य काही प्रमाणात खराब असते. पुरवठा विभागच प्रमाणित धान्य रेशनधान्य दुकानदारांना देत नाही म्हणजे खराब धान्य पुरवठयाला शासनच जबाबदार आहे.

➢ **तक्ता क्र. १३ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थ्यांकडून कडधान्याची मागणी होते किंवा नाही याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | कडधान्याची मागणी होते. | ९३ | ९३ |
| २. | कडधान्याची मागणी होत नाही. | ०७ | ०७ |
| एकूण | | १०० | १०० |

वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील ९३ % लाभार्थ्यांकडून कडधान्याला मागणी आहे.  फक्त ७% लाभार्थ्यांना कडधान्याची गरज नाही. याचाच अर्थ शासनाने सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून कडधान्याचा पुरवठा करणे गरजेचे आहे.

➢ **तक्ता क्र. १४ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील रेशनधान्य दुकानदारांना दुकान चालवण्याचे किंवा त्या बाबतच्या नियमांची माहिती होण्यासाठी शासनस्तरावरुन नियमित प्रशिक्षण देण्यात यावे किंवा नाही याबाबतची माहिती दर्शवणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | नियमित प्रशिक्षण देण्यात यावे. | ८९ | ८९ |
| २. | सर्वनियमांची  माहिती आहे. प्रशिक्षणाची आवश्यकता नाही. | ११ | ११ |
| एकूण | | १०० | १०० |

वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील ११%  रेशनधान्य दुकानदारांना नियमित प्रशिक्षण द्यावे असे वाटत नाही. तर ८९%  रेशनधान्य दुकानदारांना प्रशिक्षणाची आवश्यकता आहे असे वाटते. यावरुन असे स्पष्ट होते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील अनेक स्वस्तधान्य दुकानदारांना दुकान चालवण्याचे सर्व नियम माहिती नाहीत. त्यामुळे धान्य वितरणाचे काम पारदर्शकपणे होत नाही.

➢ **तक्ता क्र. १५ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थ्यांच्या उत्पन्नानुसार शिधापत्रिकांचे वर्गीकरण योग्य आहे किंवा नाही याबाबतचा तपशील दर्शवणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | लाभार्थ्यांना शिधापत्रिका निकषांप्रमाणे | ६९ | ६९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | देण्यात आल्या आहेत. | | |
| २. | लाभार्थ्यांना शिधापत्रिका निकषांप्रमाणे देण्यात आल्या नाहीत. | ३१ | ३१ |
| एकूण | | १०० | १०० |

बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील ६९% लाभार्थी योग्य निकषांप्रमाणे निवडले आहेत तर ३१% लाभार्थी योग्य निकषांप्रमाणे निवडले नाहीत असे लक्षात येते. सार्वजनिक वितरण योजनेत लाभार्थी हा घटक फार महत्त्वाचा आहे. पिवळी शिधापत्रिका, केशरी शिधापत्रिका, शुभ्र शिधापत्रिका या उत्पन्नाच्या वर्गवारीवरुन निवडण्यात येतात. यावरुन असे लक्षात येते की, सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थ्यांची निवड योग्य निकषांमुळे न झाल्याने सवलतीच्या धान्याचा लाभ श्रीमंत लोक घेतात. याचाच अर्थ सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील कार्य हे पारदर्शपणे चालत नाही.

➢ **तक्ता क्र. १६ –** बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील रेशनधान्य दुकानदारांना वितरणासाठी डाळ परवडतें किंवा नाही याबाबतची माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | डाळ वितरणासाठी परवडते. | ११ | ११ |
| २. | डाळ वितरणासाठी परवड्त नाही. | ८९ | ८९ |
| एकूण | | १०० | १०० |

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक वितरण योजनेतील ११% रेशनधान्य दुकानदारांना डाळ वितरणासाठी परवडते. तर ८९% रेशनधान्य दुकानदारांना डाळ वितरणासाठी परवडत नाही. तांदूळ व गहू वितरणासाठी परवडतो पण डाळ परवडत नाही कारण

डाळीसाठी शासनाकडून कमी कमिशन देण्यात येते. तसेच डाळीचा दरही जास्त असल्यामुळे लाभार्थी वितरण योजनेतील डाळ घेवू शकत नाहीत.

**संदर्भ** : **१.** http://pune.nic.in

२. संदर्भ : आर्थिक व सामाजिक पहाणी , २०१४ – २०१५

३.https://www.census2011.co.in/data/district/359-pune-maharashtra.html

४. https://mr.wikipedia.org

५. पंचायत समिती माहिती अहवाल, बारामती

६ http://mahafood.gov.in/website/english/home.aspx